इत्यादी.

**गटविकास अधिकारी :-**

ज्याप्रमाणे ग्रामपंचायतीसाठी ग्रामसेवक हा प्रशासकीय अधिकारी म्हणून काम पाहतो त्याप्रमाणे पंचायत समिती व राज्य शासन यांच्यातील प्रशासकीय दुवा म्हणून गटविकास अधिकारी असतो. त्याची नेमणूक अधिनियम १९६१ च्या कलम ९७ नुसार केली जाते. गटविकास अधिकाऱ्यांचे राजपत्रित वर्ग-१ व राजपत्रित वर्ग-२ असे दोन गट आहेत. ज्या पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रात १ लाख लोकसंख्येपेक्षा जास्त लोक राहतात तेथे राजपत्रित वर्ग-१ व जेथे १ लाख लोकसंख्येपेक्षा कमी असणारी पंचायत समिती असते तेथे राजपत्रित वर्ग-२ हा गटविकास अधिकारी असतो. ही निवड राज्यशासनामार्फत घेतल्या जाणा-या लोकसेवा आयोगाच्या परिक्षेतून पाच उमेदवारामधून केली जाते. तसेच विस्तार अधिका-याची बढती होऊनही गटविकास अधिकारी नियुक्त होऊ शकतो.

**गटविकास अधिका-याचे कार्ये :-**

गटविकास अधिकारी हा पंचायत समितीचा प्रशासकीय प्रमुख व सचिव असतो. त्याची नियुक्ती राज्यशासनाकडून केली जाते. पंचायत समितीच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी गटविकास अधिका-यास काही महत्पपूर्ण कार्य करावी लागतात.

१. पंचायत समितीचे प्रशासन चालविणे, देखरेख व नियंत्रण ठेवणे.
२. पंचायत समितीच्या बैठकांचे आयोजन करणे,कामकाजाची नोंद ठेवणे,
३. जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्यात समन्वय ठेवणे.
४. विस्तार अधिका-यांच्या कार्यावर देखरेख ठेवणे.

५. शासनाने दिलेले अनुदान वाटप करणे
६. केंद्र व राज्य शासनाच्या विकास योजनांची अंमलबजावणी करणे.
७. कार्य क्षेत्रातील ग्रामपंचायतीच्या कामकाजांवर लक्ष ठेवणे.
८. पंचायत समितीच्या कार्याचा अहवाल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-याकडे पाठवणे.

अशा प्रकारे राज्य शासनाच्या योजना तालूका स्तरावर राबवण्याच्या दृष्टीने तसेच तालूका स्तरीय व ग्रामस्तरीय प्रशासकीय कामकाजावर नियंत्रण ठेवण्याचे, प्रसंगी मार्गदर्शन करण्याचे महत्वाचे कार्य गटविकास अधिका-यास करावे लागते.